विक्रीकर आयुक्त महाराष्ट्र राज्य
मुंबई यांचे कार्यालय, ८ वा मजला,
नवीन इमारत, विक्रीकर भवन,
माझगांव, मुंबई - ४०० ०१०.

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र. विकवि १२११/प्र.क्र. २९१/वि.प्र.४, मुंबई, दि. १८.११.२०११
२. कार्यालयीन आदेश क्र. अपिले/एकत्रिकरण/पुनर्रचना कक्ष/ प्र.क्र. ६०/ब-३७९, मुंबई , दि. ०१.१२.२०११.
३. कार्यालयीन आदेश क्र. विविआ/म.रा./पुनर्रचना कक्ष/अपिले कार्यभार/प्र.क्र.६०/ब-४३० दि.०३.०५.२०१२.
४. कार्यालयीन आदेश क्र. विविआ/पुनर्रचना कक्ष/अपिले कार्यभार/प्र.क्र.६०/ब-१३, दि. १३.०१.२०१४.
५. कार्यालयीन आदेश क्र. विविआ/पुनर्रचना कक्ष/अपिले कार्यभार/प्र.क्र.६०/ब-१३० दि. ०१.०४.२०१४.
६. शुध्दीपत्रक क्र. विविआ/पुनर्रचना कक्ष/अपिले कार्यभार/प्र.क्र.६०/ब-५९३, मुंबई, दि. ०३.०१.२०१५
७. प्रशासकीय परिपत्रक क्र. JCST/HQ-7/Restructuring/Adm Instructions /2015/No.01 Mumbai, Dt. 07.12.2015
८. कार्यालयीन आदेश क्र. विविआ/२०१५/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/फेररचना/अपिले कार्यभार/ब-७६ दि. १७.१२.२०१५.
९. वित्त विभाग शासन निर्णय, क्रमांक विकवि-१२१६/प्र.क्र.४/वि.प्र.४, मंत्रालय, मुंबई दि. २६.०२.२०१६.

## कार्यालयीन आदेश

क्रमांक:- विविआ/२०१५/आस्था-३/पुनर्रचना कक्ष/फेररचना/अपिले कार्यभार/प्र.क्र.७६ मुंबई, दिनांक 28 NOV 2016

१) **प्रस्तावना:-**

१.१ शासन निर्णय दि. १८/११/२०११ अन्वये विक्रीकर विभागाच्या पुनर्रचना आढावा मंजुर करण्यात आला होता. मुल्यवर्धित कर कायद्याची अंमलबजावणी करताना व्यापा-यांकडुन विक्रीकर कायद्यातील तरतुदीचे तंतोतंत पालन होईल व त्यामुळे अधिका-यांना किमान निर्धारणा आदेश पारीत करावे लागतील ही बाब विचारात घेऊन अपिलांच्या कामासाठी विक्रीकर सहआयुक्त यांची १७ पदे मंजूर करण्यात आलेली होती. तथापि संगणकीय प्रणालीमुळे प्रत्येक व्यापा-याची अद्ययावत माहिती उपलब्ध होत असल्याने व त्याचे विश्लेषण करणे शक्य झाल्याने, मागील तीन ते चार वर्षात व्यापा-यांनी केलेल्या करचुकवेगिरीची जास्तीत जास्त प्रकरणे उघडकीस आलेली आहेत. त्याच कालावधीत मोठया प्रमाणात हवाला व्यापाऱ्यांचा (Non Genuine dealers) शोध घेणे संगणक प्रणालीमुळे शक्य झाले आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांकडून कर चुकवेगिरी केलेला कर भरणा करुन घेण्यात आला आहे व ज्या प्रकरणात व्यापाऱ्याने कर भरणा केला नाही अशा प्रकरणात मोठया प्रमाणात निर्धारणा आदेश पारीत केले गेले त्यामुळे नव्याने दाखल झालेल्या अपीलांची संख्या मोठया प्रमाणात वाढली. त्यासाठी या कार्यालयाच्या दि. ०३/०५/२०१२ च्या आदेशान्वये इतर कामासाठी मंजुर असलेल्या विक्रीकर

उपआयुक्त संवर्गातील १९ अधिकाऱ्यांना अपिल निपटाऱ्याचे काम सोपविण्यात आलेले आहे. असे असले तरी, कर चुकवेगिरीची प्रकरणे अद्यापही उघडकीस येत असल्याने अपीलांच्या संख्येत वाढ होत आहे. परिणामत: अपील शाखेत मोठया प्रमाणात कामामध्ये वाढ झालेली आहे. त्यामुळे अपील प्राधिकाऱ्यांचा बहुतांश वेळ नव्याने दाखल झालेल्या अपील प्रकरणात स्थगिती कार्यवाहीच्या अपीलांमध्ये व्यापाऱ्याला सुनावणीसाठी वेळ देऊन अंशत: भरणा रक्कम निश्चीत करणे व स्थगिती आदेश पारित करण्यामध्ये जात आहे. याचा विपरीत परिणाम गुणवत्तेवर अपील निकाली काढण्यावर होत असुन अपील प्राधिकाऱ्यांना वाढत्या अपीलांच्या संख्येमुळे कामाचे नियोजन करणे शक्य होत नाही. व्यापाऱ्यांनी तसेच त्यांच्या कर सल्लागारांनी देखील प्राथमीक सुनावणीसाठी अपील कार्यालयांमध्ये जास्त वेळ जात असल्याचे व त्यामुळे स्थगिती आदेश प्राप्त करण्यासाठी विलंब होत असल्याचे निदर्शनास आणले आहे.

१.२ या सर्व बाबींचा विचार करता स्थगिती अर्जावरील कार्यवाही इतर समकक्ष अधिकाऱ्यांमार्फत स्वतंत्रपणे केल्यास मुळ अपील प्राधिकाऱ्यांना अपीलांचा निपटारा करण्यावर लक्ष केंद्रीत करता येईल. स्थगिती अर्जावरील कार्यवाही जलदगतीने व्हावी यासाठी विक्रीकर विभागातील अनुभवी असलेल्या विक्रीकर सहआयुक्त व विक्रीकर उपायुक्त या संवर्गातील अधिकाऱ्यांना स्थगिती आदेश जारी करण्यापर्यंतचे काम देण्यात यावे असा प्रशासकीय निर्णय संदर्भ क्र. ९ मधील दि. २६.०२.२०१६ च्या शासन निर्णयाव्दारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन खालीलप्रमाणे घेण्यात येत आहे.

**२) अपील प्रकरणे दाखल करणे व स्थगिती आदेश पारित करण्याची कार्यपध्दती**

२.१ हे कार्यालयीन आदेश निर्गमीत झाल्याच्या दिनांकापासुन विक्रीकर अधिकारी व सहायक विक्रीकर आयुक्त यांनी पारित केलेल्या निर्धारणा आदेशांविरुध्दचे अपील त्या अधिकाऱ्यांच्या संबंधीत नियंत्रक विक्रीकर उपायुक्तांकडे तर विक्रीकर उपायुक्त यांनी पारित केलेल्या निर्धारणा आदेशांविरुध्दचे अपील त्या अधिकाऱ्यांच्या संबंधीत नियंत्रक विक्रीकर सहआयुक्त यांचेकडे दाखल करण्यात यावे. अपील दाखल झाल्यानंतर संबंधीत नियंत्रक विक्रीकर उपायुक्त व विक्रीकर सहआयुक्त यांनी व्यापाऱ्याला सुनावणीची योग्य संधी देऊन स्थगिती अर्जावर सुनावणी घेऊन अंशत: कर भरणा रक्कम निश्चीत करावी व कार्यपध्दतीनुसार स्थगिती आदेश जारी करावेत. सदर स्थगिती आदेश जारी केल्यानंतर मुळ अपील गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी संदर्भ क्र. ८ मधील आदेशामध्ये नमुद केलेल्या संबंधीत अपील प्राधिकाऱ्यांकडे निपटाऱ्यासाठी कायद्याच्या तरतुदीनुसार हस्तांतरीत करावे.

२.२ अन्वेषण शाखेमध्ये निर्धारणा आदेश सहायक विक्रीकर आयुक्त (अन्वेषण) हे पारित करत असतात व अन्वेषणाबाबतची सर्व कार्यवाही ही विक्रीकर सहआयुक्त (अन्वेषण) यांच्या मार्गदर्शनाखाली होत असते. याचा विचार करता विक्रीकर उपायुक्त (अन्वेषण) यांच्याकडे अपील दाखल करणे उचीत होणार नाही. तेव्हा अन्वेषण शाखेत पारित झालेल्या निर्धारणा आदेशांविरुध्दचे अपील उपरोक्त संदर्भ क्र. ८ मध्ये नमुद केलेल्या संबंधीत अपील प्राधिकाऱ्यांकडे दाखल करण्यात यावेत.

**३) अपील कार्यवाही स्थानांतरण कार्यपध्दती:-**

३.१ मुंबई आणि पुणे येथे सदर प्रकरण ज्या क्षेत्राशी निगडीत आहे त्या क्षेत्राचे अप्पर विक्रीकर आयुक्त यांनी कार्यवाही स्थानांतरण (TAP) आदेश पारित करावेत.

३.२ मुंबई आणि पुणे व्यतिरिक्त संबंधीत नियंत्रक विक्रीकर सहआयुक्त/ अप्पर विक्रीकर आयुक्त यांनी कार्यवाही स्थानांतरण (TAP) आदेश पारित करावेत.

**४) बदललेल्या कार्यपध्दतीची अंमलबजावणी:-**

४.१ सर्व नियंत्रक विक्रीकर सहआयुक्त यांनी त्यांच्या अधिपत्याखालील विक्रीकर अधिकारी व सहायक विक्रीकर आयुक्त यांचे नियंत्रक अधिकारी असलेल्या विक्रीकर उपायुक्तांची माहिती खालील तक्यात नमुद केल्याप्रमाणे योग्य त्या ठिकाणी प्रदर्शीत करावी जेणेकरुन व्यापारी अथवा त्यांच्या प्रतिनिधींना त्यांचे अपील दाखल करतांना गैरसोय होणार नाही.

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे पदनाम | अपील प्राधिकारी (नियंत्रक अधिकारी) | मजला व केबीन क्रमांक | दुरध्वनी क्रमांक | ई-मेल |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

४.२ त्याचप्रमाणे ज्यांचे आदेशाविरुध्द अपील दाखल केली जातात त्या सर्व अधिकाऱ्यांनीही वरील बदलाची नोंद घेऊन त्या प्रमाणे त्यांच्याकडून पारीत होणाऱ्या आदेशात नेमक्या अपिल प्राधिकाऱ्याचा उल्लेख करावा.

४.३ तसेच हा कार्यालयीन आदेश निर्गमित होण्यापुर्वीच्या प्रलंबीत अपिल प्रकरणांमध्ये अंशत: करभरणा व स्थगिती आदेशाची कार्यवाही संदर्भ क्र. ८ मधील आदेशामध्ये नमुद केलेल्या संबंधित अपिल प्राधिकाऱ्यांमार्फत करावी.

या आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

विक्रीकर आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :-

१. विशेष विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मुख्य दक्षता अधिकारी, मुंबई.
३. अप्पर विक्रीकर आयुक्त, मुंबई- १,२,३,४/ठाणे/नाशिक/कोल्हापुर/नागपुर/ठाणे.
४. सर्व विक्रीकर सहआयुक्त.
५. आयुक्तांच्या कार्यालयातील सर्व कार्यासने.
६. सर्व विक्रीकर उपायुक्त, सहायक विक्रीकर आयुक्त आणि विक्रीकर अधिकारी.
७. सर्व आस्थापना अधिकारी.
८. निवडनस्ती.
९. स्थळप्रत.